# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहराच्या विविध दहनघाटावर शवदहन करण्याकरीता

**{घनकचरा व्यवस्थापन विभाग}** १० किलो शेणाच्या गोवऱ्यांचा वजन करुन शरणापर्यंत पोहचविण्याच्या कामाकरीता मंजुर निविदा संपुष्टात येणार आहे. यास्तव नविन निविदा मागवुन दोन वर्षाकरीता दरकरार करणे अभिप्रेत असल्यामुळे नविन ई-निविदा मागविण्यास्तव तसेच नविन निविदा पुर्ण होईस्तोवर जुन्या मंजुर निविदाकार यांच्याकडुन काम सुरु ठेवणे व सदर खर्च पद क्र. A२३५०११४१२११ मधुन भागविण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव सविनय सादर.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 740/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 12/02/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त तथा संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहराच्या विविध दहनघाटावर शवदहन करण्याकरीता १० किलो शेणाच्या गोवऱ्यांचा वजन करुन शरणापर्यंत पोहचविण्याच्या कामाकरीता मंजुर निविदा संपुष्टात येणार आहे. यास्तव नविन निविदा मागवुन दोन वर्षाकरीता दरकरार करणे अभिप्रेत असल्यामुळे नविन ई-निविदा मागविण्यास्तव तसेच नविन निविदा पुर्ण होईस्तोवर जुन्या मंजुर निविदाकार यांच्याकडुन काम सुरु ठेवणे व सदर खर्च पद क्र. A२३५०११४१२११ मधुन भागविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.